## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शुक्रवार दि.१२/३/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२५ वी बैठक शुक्रवार दि.१२.३.२०१० रोजी सकाळी ११.३० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ३) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ४) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ६) | मा. श्री. व्ही.जी.नायर | सदस्य |
| ७) | मा. श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ८) | मा. श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| ९) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १०) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.नंदकुमार काळे | सदस्य |
| १३) | मा.श्री. सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १६) | श्री.पी.पी.महिषी, प्रभारी निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १७) | डॉ.श्री. पुलकुंडवार | कार्यासन अधिकारी |

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, स्वागत करुन माहिती दिली की, श्री. देशमुख यांना उपमुख्य अभियंता पदावर पदोन्नती मिळाली असून निवासी कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार त्यांना देण्यात आला आहे. व मंडळाची बैठक मा. उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली होत असल्यानें त्यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२५/१**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.०९.०२.२०१०ची तहकुब झालेली बैठक दि.१६.०२.२०१० रोजी पुर्ण करण्यात आली त्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते २५ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, पृ.क्र. १३ वर , पूर्वी लिकेज, गटार लाईन खराब झाली असल्यास, पाण्याचा पाईप तुटला असल्यास किंवा अन्य काही तक्रारी आल्यास कामे होत होती.असे नमूद केले आहे त्यामध्ये " मंडळाच्या पुनर्रचित इमारतीत पूर्वी लिकेज, गटार लाईन खराब झाली असल्यास, पाण्याचा पाईप तुटला असल्यास किंवा अन्य काही तक्रारी आल्यास कामे होत होती अशी दुरुस्ती करुण्यात यावी अशी.सूचना केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी पृ.क्र. २१ वर " पार्टनरशिप फर्मला जमिन मालकाकडून पुनर्विकास करण्याचे अधिकार दाखल करण्याच्या अटीवर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. " या वाक्यात दुरुस्ती करुन " पार्टनरशिप फर्मला जमिन मालकाकडून पुनर्विकास करण्याचे " अधिकार दिले तरच प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी " अशी दुरुस्ती करण्याची सूचना केली.

त्यांनी असेही निदर्शनास आणले की, मागील बैठकीत त्यांनी इमारत कोसळल्यानंतर रहिवाशांना त्वरित कम्युनिटी हॉलमध्ये हलवविण्यासाठी व त्या कम्युनिटी हॉलमध्ये सुमारे ५० ते ६० कुटुंबे राहतील एवढा मोठा कम्युनिटी हॉल मंडळाकडे असावा अशी सूचना केली होती ती कार्यवृत्तांतात नमूद करावी व त्यांच्या हया सूचनेबाबत कार्यवाही व्हावी.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी उमरखाडी येथील साईकृपा या पुनर्रचित इमारतीतील रहिवाशांकडून भाडे वसुल करण्यासाठी भाडेवसुलीकार जात नाही. रहिवाशी भाडे भरण्यास तयार असतात. तरी देखील त्या भाडेकरुंना दंड आकारण्यात आला आहे हे बरोबर नाही. मंडळाचा भाडेवसुलीकार गेला असता तर रहिवाशांचे भाडे थकित राहिले नसते. त्यामुळे अशा प्रकरणात दंड आकारण्यात येऊ नये अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी ईस्त्राइल मोहल्ला ही इमारत पुनर्रचित होऊनही रहिवाशांना गाळे वाटप करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ? अशी विचारणा केली असता श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी गाळे वाटपाबाबत माहिती दिली.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी शासनाकडून निधी मिळूनही जून्या इमारतींची दुरुस्ती किंवा पुनर्रचना करण्यात येत नाही. अनेक जून्या इमारती अशाच पडून आहेत. लोक संक्रमण शिबीरात खितपत पडले आहेत. असे निदर्शनास आणले.

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सूचना केली की, मा. सदस्यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयांची सर्व अधिका-यांनी नोंद घ्यावी व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता योग्य ती कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी सूचना केली की, मागील बैठकीत संक्रमण शिबीरातील गाळयात राहणा-या रहिवाशांची माहिती फलकावर लावण्याबाबत, बँकेमार्फत

भाडेवसुली करण्याबाबत, कलम ३३(७) खाली ना हरकत प्रमाणपत्राद्वारे पुनर्विकसित झालेल्या इमारतीतील अतिरिक्त गाळे बृहतसूचीवरील गाळेधारकांना वितरीत करण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. त्या सूचनांवर कार्यवाही करुन सदर मुद्दे संपुष्टात आणावेत अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. बांदिवडेकर यांनी पुनर्रचित इमारतीत रहिवाशांना गाळे वाटप केले जाते. पण कमिटी, संस्था किंवा ग्रामस्थ मंडळाला गाळे वाटप करण्याबाबत काय मार्गदर्शक तत्वे आहेत का ? अशी विचारणा केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत तपासणी करुन पुढील बैठकीत माहिती द्यावी.

पान क्र.१२ वरील शेवटच्या परिच्छेदामध्ये मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी "मुंबई समाचार" या वृत्तपत्रात मंडळाच्या २६,००० इमारती धोकादायक आहेत, अशी बातमी प्रसिध्द झाली आहे असे निदर्शनास आणून खरा आकडा किती आहे हे कळून येत नाही. त्यामुळे एकूण किती इमारती आहेत, त्यापैकी किती दुरुस्त झाल्या, किती पुनर्विकसित झाल्या याची यादी देण्यात यावी. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सविस्तर माहितीची सी.डी.मा.सदस्यांना लवकरच देण्यात येईल असे मागिल बैठकीत सांगितलेले होते त्याबद्दल काय झाले अशी मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी विचारणा केल्यावर सर्व उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना मुख्य अधिकारी यांनी सी.डी.लवकरात लवकर तयार करण्याच्या व सदर माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी अशा सूचना दिल्या. मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतात पान क्र.१३ वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्हेकेशन नोटीसबाबत पुढील कार्यवाही काय झाली. त्याबाबत उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी मागील बैठकीत दिलेल्या सूचनेप्रमाणे एप्रिल-२०१० अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे सांगण्यात आले. तसेच पान क्र.१४ वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किती अर्ज आले, काय प्रगती आहे अशी मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी विचारणा केल्यावर अर्ज स्विकारण्याची तारीख १२ पर्यंत वाढविण्यात आली असल्याचे तसेच प्रतिक्षा नगर सायन व इतर दोन तीन संक्रमण शिबीरे सोडल्यास बहुतांश ठिकाणी मोठया प्रमाणात अर्ज आलेले आहेत, असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले. तसेच पान क्र.१४ वरील मुद्दा क्र.२ वर मंडळाने अर्थसंकल्पात अपाघातग्रस्तांना रु.२५ लाखांची मदत करण्यासाठी जी तरतूद केली होती व धोरण ठरविले होते ते प्राधिकरणाने प्रलंबित ठेवलेले आहे त्याचा पाठपुरावा करावा, असेही मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले.

पान क्र.२६ वरील शेवटच्या परिच्छेदामध्ये मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी डिझास्टर मॅनेजमेंट बाबतचे पुस्तक अपडेट करुन त्याची नवीन प्रत देण्याची सूचना केली होती. त्याप्रमाणे अपडेट करण्याचे काम चालू आहे, असे श्री. महीशी यांनी सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक १२५/२**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.२७ ते ४१ व ८९ ते १०३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी खालील आठ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रकरणी ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.१३०८ आणि १३०९ भायखळा विभाग, इ.क्र.३२-३६ आणि ३८, शेख अुरहान कमरुद्दीन स्ट्रिट, मुंबई-४०००००८ ('ई-२'-विभाग).

२. भुकर पहाणी क्र.८६९, भायखळा विभाग, इ.क्र.१७, ४थी कामाठीपुरा लेन, मुंबई ४०० ००८ ('ई-२'-विभाग).

३. भुकर पहाणी क्र.२०९, ताडदेव विभाग - इ.क्र.३२-३४ व ४०-४६ (११६-११८) इ.क्र.१ व इ.क्र.२, शुक्लाजी स्ट्रिट, मुंबई-४०० ००४ ('डी-२'-विभाग).

४. भुकर पहाणी क्र. ७०४, मांडवी विभाग - इ.क्र.६२-६४-६६, नागदेवी स्ट्रीट मुंबई ('ब'-विभाग)

५. अंतिम भुखंड क्र.१६५-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इमारत क्र.८, डी.एल.वैद्य रोड व राम मारूती रोड, दादर (प), मुंबई-२८, '**प्रकाश पांडुरंग दामले निवास**'.

६. भुकर पहाणी क्र.१७६ ताडदेव विभाग इ.क्र.१२४-१४४ए, पठ्ठे बापूराव मार्ग, मुंबई येथील '**हकीम चाळ**'.

७. भुकर पहाणी क्र.६५६ गिरगाव विभाग, डॉ.देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील '**गणेश कृपा बिल्डिंग**'.

८. भुकर पहाणी क्र.१२८२, गिरगाव विभाग, इ.क्र.२८-३०, पारेख स्ट्रिट, मुंबई येथील '**रतिलाल मॅनशन**'.

**ठराव क्रमांक : १२५/१०५४**

मुंबई बेटावरील खालील ८ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पहाणी क्र.१३०८ आणि १३०९ भायखळा विभाग, इ.क्र.३२-३६ आणि ३८, शेख अुरहान कमरुद्दीन स्ट्रिट, मुंबई-४०००००८ ('ई-२'-विभाग).

२ भुकर पहाणी क्र.८६९, भायखळा विभाग, इ.क्र.१७, ४थी कामाठीपुरा लेन, मुंबई ४०० ००८ ('ई-२'-विभाग).

३ भुकर पहाणी क्र.२०९, ताडदेव विभाग - इ.क्र.३२-३४ व ४०-४६ (११६-११८) इ.क्र.१ व इ.क्र.२, शुक्लाजी स्ट्रिट, मुंबई-४०० ००४ ('डी-२'-विभाग).

४ भुकर पहाणी क्र. ७०४, मांडवी विभाग - इ.क्र.६२-६४-६६, नागदेवी स्ट्रीट मुंबई ('ब'-विभाग).

५ अंतिम भुखंड क्र.१६५-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इमारत क्र.८, डी.एल.वैद्य रोड व राम मारूती रोड, दादर (प), मुंबई-२८, **'प्रकाश पांडुरंग दामले निवास'**.

६ भुकर पहाणी क्र.१७६ ताडदेव विभाग इ.क्र.१२४-१४४ए, पठ्ठे बापूराव मार्ग, मुंबई येथील **'हकीम चाळ'.**

७ भुकर पहाणी क्र.६५६ गिरगाव विभाग, डॉ.देशमुख लेन, गिरगाव, मुंबई येथील **'गणेश कृपा बिल्डिंग'**.

८ भुकर पहाणी क्र.१२८२, गिरगाव विभाग, इ.क्र.२८-३०, पारेख स्ट्रिट, मुंबई येथील **'रतिलाल मॅनशन'**.

बाब क्रमांक १२५/३ (१)

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४३ ते ४७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. चर्चेअंती परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील ११ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १,७६,६८,४४८/- व निव्वळ रक्कम रु.१,१३,३४,५३०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव क्रमांक :१२५ /१०५५

परिमंडळ-१: अे,बी,सी-१,सी-२,सी-३विभागातील ११ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १,७६,६८,४४८/- व निव्वळ रक्कम रु.१,१३,३४,५३०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**बाब क्रमांक १२५/३ (२)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४९ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१: अे, बी, सी-१, सी-२, सी-३ विभागातील ३२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,८६,०९,१८४/- व निव्वळ रक्कम रु.२,६८,१३,६०२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२५ / १०५६**

परिमंडळ-१: अे,बी,सी-१,सी-२,सी-३विभागातील **३२** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,८६,०९,१८४/- व निव्वळ रक्कम रु.२,६८,१३,६०२/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२५/३ (३)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) २९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५९ ते ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) २९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशें व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,७४,४४,८१७/- व निव्वळ रक्कम रु.३,२९,१०,८५३/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२५/१०५७</u>

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) २९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.५,७४,४४,८१७/- व निव्वळ रक्कम रु.३,२९,१०,८५३/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

<u>बाब क्रमांक १२५/३ (४)</u>

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) २८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६७ ते ७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) २८.उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,१४,४८,९९९/- व निव्वळ रक्कम रु..२,२७,६८,९६५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२५ / १०५८</u>

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) २८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,१४,४८,९९९/- व निव्वळ रक्कम रु..२,२७,६८,९६५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२५/३ (५)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) ८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७५ ते ७९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) ८ .उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१,६६,६६,१७०/- व निव्वळ रक्कम रु.१,०२,९२,७१०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२५ / १०५९**

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) ८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.१,६६,६६,१७०/- व निव्वळ रक्कम रु.१,०२,९२,७१०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

**बाब क्रमांक १२५/४**

विषय- **म्हाड अधिनियम कलम १०३(ब) अंतर्गत भुसंपादनाबाबतचा प्रस्ताव.**

---

०) भूकर पहाणी क्र.१२/१४, परेल विभाग, ५०(१) आणि ५१(१), स्ट्रिट क्र.११-१२, एफ.एस.वॉर्ड, अनंत निवास, साने गुरूजी मार्ग लालबाग, मुंबई-१२ **अनंत निवास सहकारी गृहनिर्माण संस्था(नियोजित)**
०) भूकर पहाणी क्र.१०२/७४, बिल्डिंग क्र.२०७, रूबी टेरेस, डॉ.बी.ओ.मार्ग, मुंबई-१३, एफ.एस.वॉर्ड, **रूबी टेरेस सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.८१ ते ८३ व ८५ ते ८७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२५/१०६०**

म्हाड अधिनियम कलम १०३ (ब) अंतर्गत भूसंपादनाबाबतच्या खालील दोन प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भूकर पहाणी क्र.१२/१४, परेल विभाग, ५० (१), आणि ५१ (१), स्ट्रीट क्र. ११-१२, एफ.एस.वॉर्ड, अनंत निवास, साने गुरुजी मार्ग, लालबाग, मुंबई-१२ **अनंत निवास सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)**

२. भूकर पहाणी क्र.१०२/७४, बिल्डींग क्र.२०७, रुबी टेरेस, डॉ.बी.अे.मार्ग, मुंबई-१३, एफ.एस.वॉर्ड,**रुबी टेरेस सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)**

---

**बाब क्रमांक - १२५/५**

**विषय** - भूकर पहाणी क्र.३१९ माझगांव विभाग, म्हातार पखाडी रोड, माझगांव, मुंबई-१० मधील ना हरकत प्रमाणपत्रधारकाच्या नावात बदल.

---

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१०९ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२५/१०६१**

भूकर पहाणी क्र.३१९ माझगांव विभाग, म्हातार पखाडी रोड, माझगांव, मुंबई-१० मधील ना हरकत प्रमाणपत्रधारकाच्या मे. कपिल कन्स्ट्रक्शन ऐवजी श्री. नवदीप शर्मा असा नावात बदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १२५/६ (१)**

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१११ ते ११७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१ मधील अ, ब, सी-१, सी-२, सी-३ विभागातील १८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,२७,७०,८९३/- व निव्वळ रक्कम रु.३,०२,९९,६४५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२५ / १०६२**

परिमंडळ-१ मधील अ, ब, सी-१, सी-२, सी-३ विभागातील १८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,२७,७०,८९३/- व निव्वळ रक्कम रु.३,०२,९९,६४५/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक - १२५/६ (२)**

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र..११९ ते १२३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग/दक्षिण विभागातील १३ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १,४६,९०,००५/- व निव्वळ रक्कम रु.१,००,४२,११७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२५ / १०६३**

परिमंडळ-२ मधील डी-१, डी-२, ग/दक्षिण विभागातील १३ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार

विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १,४६,९०,००५/- व निव्वळ रक्कम रु.१,००,४२,११७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक - १२५/६ (३)**

विषय- मुं.इ.दु.व पु.मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१२५ ते १२७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती परिमंडळ-४ मधील फ/उत्तर विभागातील १ उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.९,२५,६४०/- व निव्वळ रक्कम रु. ९,२५,६४०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

<u>ठराव क्रमांक :१२५ / १०६४</u>

परिमंडळ-४ मधील फ/उत्तर विभागातील १ उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या मुळ मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.९,२५,६४०/- व निव्वळ रक्कम रु. ९,२५,६४०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक - १२५/७ (१)**

विषय- इ.क्र.२२, वाडीया स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे अंदाजपत्रकातील त्रुटीची पूर्तता करुन नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१२९ ते १३१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**बाब क्रमांक - १२५/७ (२)**

विषय- इ.क्र.२३१-२३३,नागदेवी स्ट्रीट, १४५, जंजीकर स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे सुधारित अंदाजपत्रकातील त्रुटीची पूर्तता करुन नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३१ ते १३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**बाब क्रमांक - १२५/८ (१)**

विषय- इ.क्र.७, काझी सय्यद मार्ग, या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे अंदाजपत्रकातील त्रुटीची पूर्तता करुन नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र..१३७ ते १३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**बाब क्रमांक - १२५/८ (२)**

विषय- इ.क्र.१०५-१११, के.एम. शर्मा मार्ग, या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे अंदाजपत्रकातील त्रुटीची पूर्तता करुन नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र..१४१ ते १४३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्रमांक :१२५ / १०६५**

खालील इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे सुधारित अंदाजपत्रकातील त्रुटीची पूर्तता करुन नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

१) इ.क्र.२२, वाडीया स्ट्रीट

२) इ.क्र.२३१-२३३,नागदेवी स्ट्रीट, १४५, जंजीकर स्ट्रीट

३) इ.क्र.७, काझी सय्यद मार्ग

४) इ.क्र.१०५-१११, के.एम. शर्मा मार्ग

---

**बाब क्रमांक - १२५/९**

विषय- पटेल बिल्डिंग, गणपतराव कदम मार्ग च्या कामास मंजूर झालेला विशेष निधी मानाजी राजूजी चाळ क्र.२ या इमारतीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१४५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण श्री. सचिन अहिर साहेब यांच्या मतदारसंघात विशेष निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या पटेल बिल्डिंग, गणपतराव कदम मार्ग च्या कामास मंजूर झालेला विशेष निधी रु. १/- लाख (रु. एक लाख) मानाजी राजूजी चाळ क्र.२ या इमारतीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत सर्वानुमते संमती देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२५ / १०६६**

पटेल बिल्डिंग, गणपतराव कदम मार्ग च्या कामास मंजूर झालेला विशेष निधी मानाजी राजूजी चाळ क्र.२ या इमारतीसाठी उपलब्ध करुन मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

बैठकीच्या अखेरीस मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा नि.का.अ. १९/३/१०
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी
मुं.इ.दु.व पु.मंडळ